**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १२ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे, त्यांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं आवाहन.**
2. **नागपूर जिल्ह्याच्या उमरेड तालुक्यातील अल्युमिनियम फॉइल कंपनीत स्फोट, 5 कामगारांचा मृत्यू, पालकमंत्री बावनकुळे यांच्या कडून मदत जाहीर.**
3. **तांत्रिक बिघाडामुळे देशभरात युपीआय सेवा विस्कळीत.**
4. **हनुमान जयंती सर्वत्र भक्तिभावाने साजरी.**

---------------------------------------

**शिवाजी महाराजांची ३४५वी पुण्यतिथी**

**छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे. त्यांना महाराष्ट्रापुरते मर्यादित ठेवू नका, असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. महाराष्ट्रात किल्ले रायगड इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.**

***मैं तो आज महाराष्ट्र के लोगों को दो हाथ जोड़कर विनंती करने आया हूँ। शिवराय को महाराष्ट्र तक सीमित मत रखिये। देश और दुनिया शिवराय से प्रेरणा ले सकती है। स्वधर्म पर अभिमान करना, स्वराज की आकांक्षा रखना और स्वभाषा को अमर बनाना ये तीन विचार देश की सीमाओं के साथ जुड़े नहीं हैं, मानव जीवन के स्वाभिमान के साथ जुड़े हुए.***

**अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचं स्मारक विकसित करण्यासाठी राज्यशासन कसोशीने प्रयत्न करेल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिलं. दिल्लीतही छत्रपतींचं स्मारक उभारावं, अशी मागणी त्यांनी केली. भाजपाचे खासदार आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती उदयन राजे भोसले यांचंही यावेळी भाषण झालं. छत्रपती शिवरायांशी संबंधित पर्यटनस्थळांचं सर्किट विकसित करावं, अशी मागणी त्यांनी केली. कार्यक्रमापूर्वी अमित शहा यांनी पाचाड इथं जाऊन राजमाता जिजाऊ भोसले यांच्या समाधीला वंदन केलं.**

---------------------------------------

**अमेरिकन सरकारकडे नोंदणी**

**अमेरिकेत ३० दिवसांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या सर्व परदेशी नागरिकांनी अमेरिकन सरकारकडे नोंदणी करणं अनिवार्य असल्याचं अमेरिकी सरकारनं स्पष्ट केलं आहे. याचं पालन न केल्यास त्यांना कठोर दंड, तुरुंगवास तसंच हद्दपारीला सामोरं जावं लागेल, असा इशारा दिला आहे. नवीन नियमानुसार सर्व व्हिसा धारक आणि वैध कायम निवासी परदेशी नागरिकांना नोंदणीचे पुरावे स्वतःसोबत कायम बाळगावे लागतील.**

---------------------------------------

**अल्युमिनियम फॉइल कंपनीत स्फोट**

**नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील एमआयडीसीत असलेल्या ॲल्युमिनियम फॉइल कंपनीत स्फोट होऊन त्यात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. या पैकी दोन जणांचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय जीएमसीमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. स्फोटात एकूण 11 कामगार गंभीर जखमी झाले आहेत. यातील 4 जणांची प्रकृती चिंताजनक आहे. एमएमपी इंडस्ट्रीज लि. कंपनीत काल सायंकाळी हा स्फोट झाला. सर्व जखमींवर नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात उपचार सुरू आहेत. काल मध्यरात्री पर्यन्त आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन दलाकडून शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज घटनास्थळी भेट दिली. यावेळी त्यांनी मृत्युमुखी पडलेल्यांना आणि जखमींना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईबाबत माहिती दिली.**

***पंचावन्न लक्ष रुपये कंपनी देईल जे मृत झाले त्यांना आणि पाच लक्ष रुपये सरकारकडनं आम्ही देऊ, असे साठ लक्ष रुपये देण्याचा निर्णय आम्ही सर्वांनी घेतला. ज्यामध्ये राजेंद्र मुळक जी माननीय खासदार बर्वेजी आमचे आमदार या ठिकाणी जयस्वालजी. जे इन्जुअरड झालेले आहे. ते आता काही काम करू शकणार नाही, त्यांना 30 लक्ष देण्याचा निर्णय या ठिकाणी प्रशासनाने घेतला आहे. म्हणजे कंपनी प्रशासनाने.***

**मृत्युमुखींच्या तसेच जखमीच्या परिवारातील लोकांना या कंपनीत नोकरी देण्याचे आश्वासन कंपनीने दिले आहे. यापुढे अशा घटना घडू नयेत, यासाठी सर्व कंपन्यांचे फायर ऑडिट होईल, अशी माहिती उमरेड विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय मेश्राम यांनी यावेळी दिली.**

---------------------------------------

**सुखोई-30**

**संरक्षण-संशोधन आणि विकास संस्थेनं सुखोई-**30 **एमकेआय विमानातून लांब पल्ल्याच्या ग्लाइड बॉम्ब गौरवची यशस्वी चाचणी काल घेतली. या चाचणीत सुमारे १०० किलोमीटरचा पल्ला अचूकपणे पार केल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली. गौरव हा एक हजार किलोग्रॅम वजनाचा ग्लाइड बॉम्ब असून चंडीपूर इथल्या संशोधन केंद्रात तो विकसित करण्यात आला आहे.**

---------------------------------------

**युपीआयच्या सेवा विस्कळीत**

**तांत्रिक बिघाडामुळे देशभरात आज युपीआयच्या सेवा विस्कळीत झाल्यानं कोट्यावधी ग्राहकांची गैरसोय होत आहे. यामुळं अनेक बँकांच्या ॲपच्या कामावर परिणाम झाला आहे. ही तांत्रिक अडचण दूर करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं कळवलं आहे. दररोज सरासरी ५९ कोटी व्यवहार युपीआय द्वारे होतात आणि त्यातून ८० हजार कोटी रुपयांची देवाणघेवाण होते.**

---------------------------------------

**विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल**

**नवीन शैक्षणिक धोरणा अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, या उद्देशाने सामाजिक न्याय आणि विशेष कल्याण विभागाद्वारे भंडारा जिल्ह्यातील अनुसूचित आणि नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा राजेदहेगाव इथल्या** 40 **विद्यार्थिनीची इस्त्रो इथं विमानानं शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थिनींना इस्त्रोचं ग्रँड मिशन चंद्रयान १, चंद्रयान २, चंद्रयान ३ आदीबद्दल माहिती देण्यात आली. सहलीच्या समारोप प्रसंगी सामाजिक न्याय भवन नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत विद्यार्थिनींनी आपल्या शैक्षणिक सहलीचे अनुभव सांगितले.**

***इस्त्रो मध्ये आम्हाला खूप काही लॉन्चिंग पॅड उपग्रह कसे प्रसिद्ध होतात ते कसे पाठवता ते दूर कशा कशाचा शोध ते, कशासाठी पाठवता ते सर्व आम्हाला तिथून सायंटिस्ट लोकांनी सांगितलं आम्हाला तिथं खूप छान वाटलं.***

**यावेळी समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाबासाहेब देशमुख, भंडारा जिल्ह्याचे समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त डॉ. सचिन मडावी,**

राजेदहेगाव येथील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध मुलींची शासकीय शाळेचे मुख्याध्यापक नरेन्द्र मेंढे, भंडारा समाज कल्याण विभागाचे निरीक्षक योगराज सावरबांधे उपस्थित होते.

---------------------------------------

हनुमान जयंती

हनुमान जयंती आज देशाच्या विविध भागात उत्साहात साजरी होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हनुमान जयंती निमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील राज्याच्या नागरिकांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हनुमान जन्मोत्सवाच्या पर्वावर नागपुरात ठिकठिकाणी असलेल्या हनुमान मंदिरांमध्ये सकाळपासूनच भाविकांची गर्दी उसळली आहे. तेल, शेंदूर अर्पण करण्यासाठी भाविक रांगेत उभे आहेत. यासोबतच हनुमंताचे स्मरण म्हणून ठिकठिकाणी  हनुमान चालिसा, बजरंग बाण, मारुती स्तोत्राचा गजर करण्यात येत आहे. जन्मोत्सवानिमित्त दक्षिण नागपुरातील राजाबाक्षा हनुमान मंदिरातून तर पश्चिम नागपुरातील गिट्टीखदान मंदिरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. देशातील सात हनुमानाच्या मूर्त्या शयनावस्थेत असून यापैकी एक गोंदिया इथं आहे. या ठिकाणी आज भाविकांची सकाळपासूनच मोठी गर्दी झाली आहे. दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज मध्य प्रदेशातील जामसावली इथल्या हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतल.

---------------------------------------

रेती घाटांचा लिलाव

गोंदिया जिल्ह्यात १८ रेती घाटांचा लिलाव झाला असून रेती वाहतुकीसाठी डेपो तयार करण्यात आले आहेत. तरीही रेती चोरीच्या घटना सुरू असल्याचं दिसून आलं आहे. काल गोंदियाच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील पथकानं गोंदियातील चौरगडे चौकात अवैधरित्या रेती भरलेली सहा वाहनं ताब्यात घेत कारवाई केली.

---------------------------------------

पाखरांच्या पणेरीचे उद्घाटन

अकोल्यातील तापमान ४४ अंश सेल्सिअसच्यावर पोहोचले असून  पशु पक्ष्यांना पाण्याची सोय व्हावी म्हणून पाखरांच्या पाणपोईचे उद्घाटन संत गाडगेबाबा कर्मभूमी सेवा प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## हवामान

नागपूरमधील प्रादेशिक हवामान केंद्रानं दिलेल्या माहितीनुसार विदर्भात आज विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याची शक्यता असून बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. आज विदर्भात अकोला इथं सर्वाधिक ४२ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. नागपूर इथं ४१ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली.

---

## मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम

'मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम' २०२५-२६ जाहीर करण्यात आला असून त्यानुसार या कार्यक्रमात ६० जणांची निवड करण्यात येणार आहे. या मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमासाठी १५ एप्रिल ते ५ मे २०२५ या कालावधीत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. राज्यातील तरुणांना प्रशासनासोबत काम करण्याचा अनुभव मिळावा, त्या सोबतच त्यांच्या ज्ञानाच्या, अनुभवाच्या कक्षा रुंदावण्यास मदत व्हावी. तरुणांमधील कल्पकता तसंच वेगळा विचार मांडण्याची क्षमता, उत्साह, तंत्रज्ञानाची आवड यांचा उपयोग प्रशासनास व्हावा आणि या माध्यमातून प्रशासकीय प्रक्रियांमध्ये गतिमानता यावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा ५६ हजार १०० मानधन आणि प्रवासखर्च ५ हजार ४०० रुपये असे एकत्रित ६१ हजार ५००रुपये शिष्यवृत्तीच्या स्वरूपात देण्यात येतील. ऑनलाईन परीक्षा देण्याची कार्यपद्धती तसंच इतर सविस्तर माहिती संचालनालयाच्या mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाहीर केली जाणार आहे.

---

## नेमबाजी

अर्जेंटिना इथं सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा फेडरेशन आयोजित विश्वकरंडक स्पर्धेत भारतानं चार सुवर्णपदकं, २ रौप्य आणि २ कास्यपदकांसह आठ पदकं जिंकून चीननंतर दुसरं स्थान मिळवलं आहे.

---